परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांकः परिवि-२०१९/प्र.क्र.(२०/१९)/तांशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ३१ मे, २०१९

संदर्भ:- १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, उवतंशि/तांशि-१/३३/१३/८५/१३,दि.२८.०७.२०१६
२. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, उवतंशि/तांशि-१/३३/१३/८६/१३१,दि.३१.०५.२०१६
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.परिवी-२७१५/प्र.क्र.३०२/आठ, दि.२९.०२.२०१६
४.संचालक, तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र. ४/आस्था/परिविक्षा/२०१९/७४, दि.१८.०२.२०१९

शासन आदेश :-

उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये श्री. मच्छिंद्र जगन्नाथ पाबळे, सहयोगी प्राध्यापक, स्वयंचल अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ आणि संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये श्री. प्रदिप कुंडलिक वायदंडे यांची सहयोगी प्राध्यापक, संगणक अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ या पदावर दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली आहे. सदरचा कालावधी पूर्ण झाल्याने श्री. मच्छिंद्र जगन्नाथ पाबळे आणि श्री. प्रदिप कुंडलिक वायदंडे यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये प्राप्त झाला आहे.

२. शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यासंदर्भातील संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन निर्णयातील अटींची पूर्तता श्री. मच्छिंद्र जगन्नाथ पाबळे आणि श्री. प्रदिप कुंडलिक वायदंडे, सहयोगी प्राध्यापक यांचे प्रकरणी होत असल्याने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी खालील तक्त्यात स्तंभ ०५ मध्ये नमूद दिनांकास समाप्त करण्यात येत आहे. तसेच त्यांची सेवा नियमितपणे पुढे चालू ठेवण्याचा दिनांक स्तंभ ०६ मध्ये नमूद करण्यात येत आहे.

अ. क्र.	अध्यापकाचे नाव व कार्यरत संस्था	रुजू दिनांक	परिविक्षाधीन कालावधीत घेतलेल्या रजा (अर्जित/ परिवर्तित)	परिविक्षाधीन कालावधी समाप्तीचा दिनांक	सेवा नियमितपणे पुढे चालू ठेवण्याचा दिनांक
१	२	३	४	५	६
१.	श्री. मच्छिंद्र जगन्नाथ पाबळे, सहयोगी प्राध्यापक, स्वयंचल अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी	दि.२५.८.२०१६	१३	दि.०६.९.२०१८ (म.नं)	दि.०७.९.२०१८ (म.पू.)
२.	श्री. प्रदीप कुंडलिक वायदंडे (देशमुख), सहयोगी प्राध्यापक, संगणक अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी	दि.२३.८.२०१६	१४	दि.०५.९.२०१८ (म.नं)	दि.०६.९.२०१८ (म.पू.)

३. संबंधित संस्था प्रमुखांनी उक्त अध्यापकाच्या पुढील वेतनवाढी मुक्त करण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही तातडीने करावी.

४. सदर शासन आदेश, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. परिवि-२७१५/ प्र.क्र.३०२/ आठ, दि. २९.०२.२०१६ मधील तरतुदींनुसार व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. परिवि/ २७१५/ प्र.क्र.२०३/ आठ, दि. २५.०८.२०१५ अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५३११६५३०५४५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sameer Laxman Dhere

Digitally signed by Sameer Laxman Dhere
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6ab4a357b0e2247b4328b57f45f509bf1bf0bd20c865128a018421c354bddc5, serialNumber=6ee64cf9b42881125c3715a5db341b5827c5743c728bc85f04bb71ff8fc154d6, cn=Sameer Laxman Dhere
Date: 2019.05.31 16:59:25 +05'30'

(समीर ढेरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबंधित अध्यापक (प्राचार्यांमार्फत)

प्रत,

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे.
३) प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
६) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) निवड नस्ती (तांशि-१).